# नियामक मंडळाची ३९ वी बैठक दिनांक २५ मे २००४

मा. ना. अजित पवार, मंत्री, पाटबंधारे (कृष्णा खोरे व कोकण महामंडळे) ग्रामविकास, पाणीपुरवठा व स्वच्छता आणि अध्यक्ष (मकृखोविम) यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची ३९ वी बैठक दि. २५.५.२००४ रोजी पाटबंधारे सभागृह, मुंबई येथे संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये विषयवार चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आले.

ठराव क्र.३९/१

''ठराव करण्यात येतो की, नियामक मंडळाच्या ३८ व्या बैठकीत पारित झालेले ठराव कायम करण्यात येत आहेत.''

ठराव क्र. ३९/२

''ठराव करण्यात येतो की, टंचाईग्रस्त भागातील प्रकल्पांवरील शासनाने मान्य केलेल्या प्रकल्पातील निवडक घटकांचा कार्यक्रम सप्टेंबर २००४ अखेर पूर्ण करण्याच्या दृष्टीने खाली नमूद केल्याप्रमाणे कार्यप्रणाली अंगीकारण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

(अ) टंचाई निवारण कार्यक्रमातील, प्रकल्प कामे पूर्ण करण्याचा कालावधी मर्यादित असल्याने ज्या ठिकाणी एखादे विशिष्ट काम पूर्ण करण्यासाठी निविदा अस्तित्वात नाही, अशा ठिकाणी त्या कामाची विशिष्ट परिस्थिती व तांत्रिक आवश्यकता यांचा योग्यप्रकारे विचार करुन ती विशिष्ठ कामे सलगतेच्या तत्वानुसार चालू असलेल्या कामांच्या निविदेतंर्गत करुन घेण्याच्या प्रस्तावांना मा.अध्यक्ष यांच्या मान्यतेने कार्यकारी संचालक स्तरावर मान्यता देण्यात यावी.

(ब) अप्पर मुख्य सचिव (नियोजन) यांच्या अध्यक्षतेखालील समितीने टंचाई निवारण कार्यक्रमांतर्गत महामंडळातील काही प्रकल्पांच्या घटकांची निवड केली आहे. ही कामे मर्यादित कालावधीत पूर्ण करण्यातील वस्तुनिष्ठ अडचणी लक्षात घेता, सदर कामे पूर्ण करण्याचा कालावधी डिसेंबर २००४ पर्यंत सुधारित करण्यासाठी समितीला विनंती करण्यात यावी. तसेच या कामांची अपेक्षित प्रगती साध्य होऊन त्याद्वारे नियोजनाप्रमाणे कामे पूर्ण होण्याच्या दृष्टीने सदर कामांशी संबंधित ठेकेदारांची प्रलंबित देयके अदा करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याची विनंतीही अप्पर मुख्य सचिव (नियोजन) यांचे अध्यक्षतेखालील समितीस करण्यात यावी.''

ठराव क्र. ३९/३

''ठराव करण्यात येतो की, श्री. प्र. ना. बेहेरे, निवृत्त जिल्हा न्यायाधीश यांची महामंडळाचे कायदे सल्लागार म्हणून दि. १.४.२००४ ते ३१.३.२००५ या कालावधीसाठी रु.८०००/- प्रतिमाह

मा. मंत्री, पा (कृखो व कोपाविमं)
ग्रामविकास, पाणीपुरवठा व स्वच्छता
आणि अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक,
म.कृ.खो.वि.म., पुणे

मानधनावर मा.अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. यांच्या मान्यतेने केलेल्या पुनर्नियुक्तीस नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.''

ठराव क्र. ३९/४

''ठराव करण्यात येतो की, महामंडळाच्या कार्यक्षेत्रातील विविध जिल्ह्यातील न्यायालयात महामंडळाच्या वतीने काम पहाणाऱ्या वकीलांना, अर्हता व पात्रता तपासून कायदा सल्लागाराच्या सल्याने नवीन नियुक्त्या देणे किंवा सध्या असलेल्या वकीलांना पुर्ननियुक्ती देणे याबाबतचे अधिकार कार्यकारी संचालक यांना प्रदान करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.''

ठराव क्र. ३९/५

''ठराव करण्यात येतो की, महामंडळाच्या अधिपत्याखालील फलटण येथील सिटी सर्व्हे न. ६४६० मधील १ एकर २ गुंठे जागा प्रियदर्शिनी ज्ञानप्रबोधिनी संस्थेस ३० वर्ष मुदतीकरिता भाडे करारावर देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.''

ठराव क्र. ३९/६

''ठराव करण्यात येतो की, श्री. एस. टी. देवकुळे, निवृत्त प्रधान सचिव तसेच श्री. के. एस. शंकराव, निवृत्त अधीक्षक अभियंता यांची महामंडळाचे तांत्रिक सल्लागार म्हणून दि.१/७/२००४ ते ३१/३/२००४ या कालावधीसाठी केलेल्या नियुक्तीस नियामक मंडळाची मान्यता देण्यांत येत आहे. ''

ठराव क्र. ३९/७

''ठराव करण्यात येतो की, 'ठेकेदाराने महामंडळाचे कार्यालयांत/विभागांत, सादर केलेल्या देयकांमधून स्वामित्व शुल्काची रक्कम वगळून उर्वरित रक्कम ठेकेदारास अदा करावी व ठेकेदाराने स्वामित्व शुल्काची रक्कम भरल्याची पावती सादर केल्यानंतर रोखून ठेवण्यात आलेली ही रक्कम ठेकेदारास अदा करावी.' अशा आशयाची शर्त यापुढील निविदांमध्ये अंतर्भूत करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.''

ठराव क्र. ३९/८

''ठराव करण्यात येतो की, कंत्राटदारास एका वेळी महामंडळातील जास्तीत जास्त तीन कामे हाती घेण्याची निविदेतील अट शिथील करुन ज्या ठेकेदारांकडे असलेल्या तीन कामांपैकी एक अथवा अधिक कामे शासनाच्या/महामंडळाच्या धोरणामुळे बंद असतील (काम बंद ठेवणे आदेश, निधी अभावी, वनजमीन, स्थानिक विरोध इ. कारणे, ज्यामध्ये ठेकेदाराचे स्वतःचे कोणतेही कारण नाही) अशा प्रकरणी त्या त्या विशिष्ट प्रकरणातील माहिती तपासून व प्रकरणाची पूर्ण पडताळणी करुन/छाननी करुन सदर बंद पडलेले काम निविदा मुल्यांकनासाठी जमेस न

मा. मंत्री, पा (कृखो व कोपाविमं)
ग्रामविकास, पाणीपुरवठा व स्वच्छता
आणि अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक,
म.कृ.खो.वि.म., पुणे

धरण्याबाबतचा निर्णय घेण्याचा अधिकार कार्यकारी संचालक यांना देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.''

ठराव क्र. ३९/९

"ठराव करण्यात येतो की, नियामक मंडळाच्या मंजूर ठराव क्र. ३८/१७ मधील, परिशिष्ट क्र.१ मधील अट क्र.४ मध्ये पुढीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे.

वितरिकांसाठी लागणाऱ्या जमिनीकरीता आवश्यक संमतीपत्रे शेतकऱ्यांकडून घेऊन ती महामंडळाकडे सुपूर्त करण्याची जबाबदारी कारखान्याची राहील. भूसंपादनाची पुढील कार्यवाही महामंडळ करील. सुधारित अट सोबतच्या परिशिष्ट क्र. १ प्रमाणे राहील."

ठराव क्रमांक ३९/१०

"ठराव करण्यात येतो की,

१. मौ. कुशी, ता. सातारा गावातील तारळी प्रकल्पांतर्गत बाधीत प्रकल्पग्रस्तांपैकी श्री. अडसुळ व इतर ३४ प्रकल्पग्रस्तांचे मूळ मंजूर पुनर्वसन आराखड्यानुसार मान्य झालेल्या मौ. मायणी, ता. खटाव येथील पुनर्वसनाऐवजी मौ. आवार्डे, ता. पाटण येथील गावात पुनर्वसन करण्याच्या सुधारित प्रस्तावास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. आणि,

२. त्या अनुषंगाने येणाऱ्या नागरी सुविधा कामांच्या सुमारे रु. २७.५७ लक्ष जादा खर्चास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. ३९/११

"ठराव करण्यात येतो की, शासनाकडे वर्ग होणाऱ्या आस्थापनेचे नियंत्रण, आस्थापना व लेखा विषयक बाबीचे हस्तांतरण इ. बाबत शासनाचे मार्गदर्शनपर आदेश निर्गमित झाल्यावर त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यास तसेच त्याअनुषंगाने महामंडळांतर्गत रहाणाऱ्या आस्थापनेची/ कार्यालयांची पुनर्रचना करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. ३९/१२

"ठराव करण्यात येतो की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून अल्पमुदतीकरिता घेतलेली रु. २००.०० कोटींची ठेव व्याजासह त्यांना परत करण्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी.

दि.३१.५.२००४ पर्यंतचे व्याज व मुद्दल अशा रु.२५९.५० कोटी या देय रकमेवरील व्याज व मूळ मुद्दल परत करण्यासाठीचे विशेष इन्स्ट्रुमेंट तयार करुन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या नावे ते देण्यात यावे. सदर इन्स्ट्रुमेंटद्वारे प्राधिकरणास प्रतिवर्षी/प्रति सहामाही

मा. मंत्री, पा (कृखो व कोपाविमं)
ग्रामविकास, पाणीपुरवठा व स्वच्छता
आणि अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक,
म.कृ.खो.वि.म., पुणे

सुमारे १० टक्के दराने अथवा शासनाची उच्चाधिकार समिती ठरवेल, यापैकी जे कमी असेल त्या त्या दराने व्याज अदा करावे. १० वर्षाच्या अखेरीस प्राधिकरणाचे मूळ मुद्दल त्यांना परत करण्यात यावे. यासाठी आवश्यक ती शासन हमी शासनाने उपलब्ध करुन द्यावी, या प्रस्तावास आवश्यकतेनुसार मंत्रीमंडळाची मान्यता घेण्यात यावी. यासाठीचा सविस्तर प्रस्ताव शासनास सादर करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. ३९/१३

"ठराव करण्यात येतो की, वांग प्रकल्पाच्या कामासाठी कंत्राटदार मे.युनिटी एशियन (डब्ल्यू) कन्स्ट्रक्शन कंपनी, मुंबई यांना प्रकल्पाचे काम वेळेत पूर्ण करण्याच्या प्रयत्नास पूरक वित्तीय सहाय्य म्हणून मंजूर केलेल्या अग्रीमावरील काम बंद असलेल्या १९४ दिवसांच्या कालावधींचे व्याज/दंडनीय व्याज रु. १,१३,५६,७११/- (रुपये एक कोटी तेरा लाख छपन्न हजार सातशे अकरा फक्त) माफ करण्याच्या कार्यवाहीबाबत सदर कंपनीची महामंडळाकडील थकीत देयकांची माहिती घेऊन त्याअनुषंगाने प्रस्ताव पुढील बैठकीत विचारार्थ ठेवण्यात यावा."

ठराव क्र. ३९/१४

"ठराव करण्यात येतो की, २००१-२००२ या वर्षाचा महामंडळाचा वार्षिक अहवाल व लेखा परिक्षण अहवालास मान्यता देण्यात येत आहे. तसेच हे अहवाल शासनास सादर करण्याच्या कार्यवाहीस नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्रमांक ३९/१५

"ठराव करण्यात येतो की, मालिका २००३/अे चे लिड ॲरेंजर ह्यांना काम केलेल्या प्रमाणात म्हणजेच देय फीच्या ४५ टक्के रक्कम वजा करुन उर्वरीत रक्कम रु. ४८,९८,४८०/- त्याप्रमाणे, प्रथमतः MOU केल्यावर अदा करणेस नियामक मंडळाची कार्योत्तर मान्यता देण्यात येत असून, ही रक्कम संबधित लिड ॲरेंजर्स यांना अदा करण्याचे अधिकार कार्यकारी संचालकांना देण्यात येत आहेत."

ठराव क्रमांक ३९/१६

"ठराव करण्यात येतो की, लघु पाटबंधारे तलाव निवकणे ता. पाटण, जि. सातारा ह्या योजनेच्या कामासाठी मे. मारुती सिव्हिल वर्क्स, नवी मुंबई यांना महामंडळाने प्रकल्पाचे काम शीघ्र गतीने करण्यासाठी दिलेले अग्रीमावरील व्याज व दंडनीय व्याज कामाची देयके ज्या ज्या वेळेस महामंडळाकडे प्रलंबित आहेत, त्या त्या कालावधीसाठी माफ करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

मा. मंत्री, पा (कृखो व कोपाविमं)
ग्रामविकास, पाणीपुरवठा व स्वच्छता
आणि अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक,
म.कृ.खो.वि.म., पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे - ११

नियामक मंडळाच्या ३९ व्या बैठकीतील ठराव क्र. ३९/९ मध्ये नमूद केलेले परिशिष्ट क्र.१

(संदर्भ : महामंडळाचे पत्र क्र. विम/१७०२/निबै-३९/(२६३/ २००२)/मोप्र-४/४३५७
दि.९.६.२००४ अन्वये पाठविण्यात आलेले ठराव)

**परिशिष्ट क्र.१**

**सुधारित अट क्र. ४ :**

कारखान्यांने ही कामे स्वतःच्या जबाबदारीवर व जोखमीवर करणे आवश्यक राहील. वितरिकांची बांधकामे व मातीकामे याकरिता आवश्यक असणाऱ्या जमिनींची संमतीपत्रे संबंधित शेतकऱ्यांकडून घेऊन ती महामंडळाकडे सुपूर्त करण्याची जबाबदारी कारखान्यांची राहील. भूसंपादनाची पुढील कार्यवाही महामंडळ करील. सार्वजनिक बांधकाम व जिल्हा परिषद यांचे ताब्यातील रस्त्याच्या ओलांड्याच्या कामाकरिता परवानगी मिळविणे व त्यासाठी शुल्क कारखान्यामार्फत भरणे आवश्यक राहील. यासाठी आवश्यक ते प्रमाणपत्र महामंडळाकडून देण्यात येईल.